सोमवार दि.१७ मार्च २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता
बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत    संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१८२ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

# माणुसकीचे धडे मनावर कोरणारे व्यक्तिमत्त्व : के.बी.जायभाये

## पुण्यस्मरणानिमित्त विनम्र अभिवादन

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

बाबा आज चार वर्ष उलटली आपणास आम्हा सर्वांना सोडून. हिमालयाच्या पर्वत रांगांप्रमांने आपण गेल्याची उणिव ही संपत नाही. इतरांची अदृश्य बुद्धी आपणास आहे किँवा नाही या भावनेत विचलित देखिल होत असेल किंवा नसेल. परंतू तुमच्या जाण्याने अनेक गोष्टी असून नसल्या सारख्या झाल्या.अनेक वेळा तुमच्या सोबतीने दिवस काढलेली माणसं भेटतात आणि तुमच्या बद्दल अधिक सांगतात तेव्हा वाटतं की तुमच्या मधील ईश्वर हा तुमची बाजु मांडतोय. ''देव आपली निश्चित मदत करेल मी लिहिलेल्या पहिल्या लेख मधील तुमचं मोलाचं वाक्य जे तुम्ही बद्दल करून घेतलं होत. आणि होय आपली सद्बुद्धी ही नेहमी प्रामाणिक भावनेने काम करत असेल तर देव हा निश्चित आपली मदत करतोच यात शंका नाही. अजून काही जण देव आहेत की नाही याचं भांगडी मध्ये पडून असतील किंबहुना ते अजून देखील या प्रश्नावर संशोधन करत असेल. पण देव हा माणसात असतो आणि होय देव हा माणसामध्येच असतोय. देवाला प्रत्येक वेळी आपल्या पर्यंत पोहचन शक्य नसतं म्हणून आपल्या आयुष्यात काही देव माणसं असतात. आणि हीच माणसं कधी दुज्याभाव करणारी नसतात. सुवर्णाने.... माझ्यामुळे हिऱ्याला महत्व किंवा हिऱ्याने त्याच्या मुळे सोण्याला किंमत असा एकात्मिक भाव केव्हाही तो आपल्याला दिसणार नाही.

आयुष्यातील एकदा गेलेली व्यक्ती परत येत नसते मग ते कोणीही असो. बाबा आज गेल्या पासून तुमच्या विचारांचा पाईक होऊन जगण्याचा जो पर्यंत केल्या त्यात कुठेही काही कमी नक्कीच जाणवली नाही. तुमची आपुलकी ही नवी ओळख देणारी होती. परिसरातील कोणत्याही व्यक्तिने तुमच्या बद्दल आम्हाला काही सांगितल असेल ते सकारात्मकच. आणि आयुष्यात शिल्लक राहत तरी काय तर ते इतकंच की आपण नसताना आपल्या बद्दल अनेकांच्या तोंडून आपली प्रशंसा होण. हेच महत्त्वाचं असतं. इतरांसाठी आपण कुठे तरी कामी आलो तरच लोक आपलं नाव घेत असतात आणि बाबा तुम्ही निश्चित सर्वांच्या कुठे ना कुठे कामी आलात म्हणुन आज तुमच्या जाण्याने अनेक गोष्टी कठोर झाल्या.

आज तुम्ही दिलेल्या आदर्श व्यक्तीचा ठसा घेऊन गाव तालुका जिल्हाच नव्हे तर अवघ्या महाराष्ट्रभर तुमच्या विचाराने मी दैनिक लोकनेता नेऊन पोहचवत आहे. आपल्यामुळे कोणाचं वाईट न होता पुढील व्यक्तीला आपली नेहमी मदत व्हावी अशी अपेक्षा नेहमी मनात असते. तुमच्या आशीर्वादाने माझं आयुष्य बहरून गेलेलं आहे ते तुमच्या सोबतीने. जो जन्मा येतो,तो नष्ट होतोच या वृत्ती प्रेमाने सर्वांना जायचं आहे किंबहुना एक दिवस मला देखील. परंतू आज मी तुमच्या विचारांनी सोबतीने जगात एका ठिकाणी पोहोचतोय आणि अशाच एका नव्या विचारांनी मी तुम्हाला देखील आयुष्य भर जग भर पोहचवत राहणार.

बाबा आयुष्य कस किंवा कोणा प्रेमाने जगाल? असा प्रश्न उपस्थित झाला तर क्षणाचा देखील विलंभ न करता मी सांगेल की माझा आयुष्यातील देव माणूस माझ्या बाबांप्रमाने जगता आल हे देखील खूप मोठं भाग्य. आज माझा समवेत जवळ जवळ ७० माणसं महाराष्ट्रात दैनिक लोकनेता ला काम करतात. ज्या सिंदखेड राजाच्या सरकारी कार्यालयात येरझारा घालत तुमच अर्ध आयुष्य गेलं तिथे आज आपलं थोड का होईना अस्तित्व टिकून आहे. परंतु या सर्व गोष्टी असून देखील तुम्ही नसल्याची खंत मनात आहे. आज मी एक यशस्वी होण्याचा प्रयत्न करतो आहे. आज पर्यंत मिळवलेल सर्व तुमच्या आशीर्वादाने यात माझं अस काहीच नाही. आणि याचा सर्वात जास्त आनंद तुम्हाला झाला असता.

**ज्ञानियांचा राजा गुरु महाराव ।**
**म्हणती ज्ञानदेव तुम्हा ऐसे ।।**
**मज पामरासी काय थोरपण।**
**पायीची वहाण पायी बरी**

मज पामराशी काय थोर पण. पायीची वाहन पायी बरी. माझा आयुष्यातली सर्वात मोल्यवान गोष्ट तुम्ही आहात. आणि होय मी जो काय आहे तो तुमच्यामुळे. तुमच्या गेल्या नंतर देखिल मी अनेक उद्योग केलेत. तुम्ही नेहमी सांगायचे की नौकरी पेक्षा धंदा करा त्यात माणूस आनंदी राहतो आणि तुम्ही ज्या वेळेस या जगाचा निरोप घेतला त्या वर्षी मी १२ वी मध्ये होतो. आणि होय त्या नंतर कुठे नौकरी लागावी म्हणून मी कधीच धावपळ केली नाही. कारण नौकरीच्या शोधात असलेले आज सुध्दा नौकरीच शोधताहेत. पण या उलट त्याचं प्रयत्नांत मी तुमच्या सांगण्या प्रमाणे स्वतःच



अस्तित्व टिकून राहील या उद्देशाने दैनिक लोकनेता पेपर चालू केला. आणि तो महाराष्ट्र भर वर्षांनु वर्ष चालू राहील. आणि होय आता लवकरच तुमच्या आशीर्वादाने नवीन क्षेत्रात प्रामाणिक प्रयत्नाने पाऊल टाकतोय आणि त्या प्रामाणिक प्रयत्नाला तुमचा आशीर्वाद नक्कीच असणार आहे. एक यशस्वी संघटक आणि उद्योजक ज्या वेळेस मला होता येईल त्या वेळेस मला एक पाऊल यशा कडे पडतंय अस म्हणता येईल.

तुम्ही सातासमुद्रापार गेल्या नंतर तुमच्या आपुलकीची माणसं देखील मला मिळाली. त्या यादीत अनेक दिग्गज व्यक्ती येतात जे मला आज देखील तुमच्या विचारांवर चालत असल्याची जान करून देतात. परंतू मला स्तब्ध करणारी एक गोष्ट म्हणजे तुमच्याच वयाची व्यक्ती (ड.डॉ. विजयकुमार कस्तुरे) मला तुमच्या जाण्या नंतर भेटावी.. आणि त्यांनी नेहमी प्रमाणे एक वाक्य द्यावं की जा छाव्यानो, करा गर्जना.... ही देखील तुमची आयुष्य भर असलेली साथ ही तुमच्या गेल्या नंतर देखील असल्याची बाब आहे. नेहमी काही झालं तरी इतरांनी सांगितल्या पेक्षा तुम्ही मला विचारायचे की काय झालं तू सांग आणि जे मी सांगेल तेच खर असायचं कारण त्या माघे एक लॉजिक असायचं ते म्हणजे तुम्हाला पूर्ण विश्वास होता की मी छोट्या किंवा थोड्या गोष्टी साठी कधी खोट बोलत नाही. आणि हीच खोटं न बोलण्याची बाब मला बारावी नंतर महाविद्यालय सोडण्यास भाग पाडणारी असावी आणि ते माझा भल्यासाठी आणि त्यानंतर कुठे तरी माझा जीवनाचा प्रवास सुरू झाला. तुमच्या आयुष्याची शेवटची वर्ष आणि माझा आयुष्याची सुरुवातीचे वर्ष एकत्र गेली आणि प्रत्येक गोष्ट ही आपल्या साठी गरजेची असो किंवा नसो पण ती आपल्याला यायला हवी हा अट्टाहास नेहमी माझ्या साठी प्रेरणादाई असेल. तुमच्या आयुष्यातली सर्वात मोठी कमाई जी विचारांची श्रीमंती असते ती तुम्ही मला दिली. मलाच दिली अस देखील मी कधीच म्हणार नाही परंतू ज्यांना ती घ्यायची त्यांनी ती घेतली आणि होय त्यात मी एक आहे. ही अभिमानाची गोष्ट.

आयुष्यात तूम्ही तुमच्या आर्थिक मदतीने मला अनेक ठिकाणी नेल अनेक गोष्टी दाखवल्या अनेक गोष्टी शिकवल्या परंतू माझ एक स्वप्न मी तुम्हाला नेहमी म्हणायचो की तुम्हाला एक दिवस तुम्ही म्हणाल तिथे घेऊन जाईल आणि होय बाबा आज तुमच्या आशीर्वादाने तुम्हाला कुठेही घेऊन जाईल इतका तरी मी नक्कीच सक्षम बनलोय परंतू आज तुम्हीच नसल्याने ते अशक्य आहे. परंतु तुम्ही नसलात तरी तुमच्या शेवटच्या काळात मी तुमच्या सोबत होतो आणि तुम्ही शेवटचा श्वास माझाच हातावर घेतला ही गोष्ट मला आयुष्य जगण्यासाठी पुरेशी आहे. तुम्हाला मी कुठे घेऊन जाऊ नाही शकलो तरी आता पुढील काळात तुमचे विचार घेऊन नी नक्कीच जग भर फिरणार आणि तुम्हाला सर्वत्र नेवून पोहोचवणार.


तुम्हाला जस वाटायचं की मी काही ना काही करतं राहावं असच वारंवार मला अनेक जण म्हणत असतात. आणि होय तुमच्या नंतर तितक्याच ताकदीने मला सहकार्य देखील अनेकांनी केलं त्यात एक नागपूरचे भगवानराव मुंडे असतील ज्यांनी मला एकच सांगितल की तुला काय मदत लागली ती मला सांग मी तुला ती निश्चित करेल. आणि त्यांनी देखील अनेक गोष्टी मध्ये मला सहकार्य केलं आर्थिक मदत द्यायचा देखिल पर्यंत त्यांनी केला पण त्या वेळेस मी त्यांना एकच वाक्य बोललो होतो की ज्या वेळेस मला गरज असेल त्या वेळेस मी स्वतः तुम्हाला फोन करेल आणि हीच माझ्या स्वाभिमानाची गोष्ट कुठे तरी त्यांच्या अंतकरणात घर करून गेली असावी. आणि ज्ञानेश्वर नेहमी प्रयत्न करणं सोडायचं नसतं.नदीचे उगमस्थान हे अगदीच अरुंद असते आणि प्रवाहित झाल्यावर हळु हळु गंगा–यमुना पात्रात तब्बल होत संथ लयीत अविरत वाहत भव्यदिव्य महासागरात समाविष्ट होत अथांग सागरात स्थिरावत आपले स्थान व नांव तयार करते तद्वतच आपल्या प्रयत्नाला यश मिळवून सागरासम स्थिरावत समाजमनात उभे रहावेत अशा त्यांच्या शूभेच्छा लाभल्या. परंतु आलीय भोगाशी व्हावे रे सादर. त्यांनी देखील लवकरच या जगाचा निरोप घेतला आणि लोकनेता च्या सुरुवातीच्या काळात मोठ नुसकान झाल्याचं जाणवलं. दुसरं नाव म्हणजे जे एक वकिली व्यवसायातील दिग्गज आणि वरिष्ठ व्यक्ती ड. डॉ. विजयकुमार कस्तुरे साहेब ज्यांनी आज

वयाची ९० वर्ष पूर्ण केलीत तरी त्यांना मी शूभेच्छा देण्यासाठी फोन केला व त्याचे शब्द कारे बाबा मी उगाचच बदनाम झालो माझा वाढदिवस आहे हे सर्वांना माहिती झाल. असा व्यक्तीला आपण विचारांचे भंडार म्हणल्यास काही वागवे ठरणार नाही. हे बघ तू अशा तुश्च लोकांना घाबरून लिहन सोडायचं नाही. काही झालं तरी मी आहे तुझा सोबत अस बोलून नेहमी पेपर चालवन्या साठी मला पाठबळ देणारे व्यक्ती बाबा च्या विचारांना सहमत असल्याचे मला जाणवले.

आज तुम्ही ४ वर्ष जाऊन झालेत पण ४ वर्ष हे ४० वर्षा ठाई असल्याचं स्पष्ट होतंय. आज उद्या आणि भविष्यात तूमचे विचार आणि आशीर्वाद नेहमी असेच माझा समवेत सर्वांच्या पाठी राहो. तुम्हाला चौथ्या पुण्यस्मरना निम्मित भावपूर्ण आदरांजली. तुमच्या विचारांवर प्रामाणिक पणाने आयुष्य जगण्याचा प्रयत्न करीत राहील हीच भावपूर्ण श्रद्धांजली बाबा....

**गेले दिगंबर ईश्वर विभूती**
**राहिल्या त्या किर्ति जगामजी ।**
**वैराग्याच्या गोष्टी ऐकिल्या त्या कानी**
**आता ऐसे कोणी होणे नाही ।।**

तुमचाच
ज्ञानेश्वर बुधवत
मुख्यसंपादक दैनिक लोकनेता
मातृतिर्थ सिंदखेड राजा



मुठीत मावल्या नाही उधळून गेल्यात स्मृती, इंद्रधनुष्याचे सारे रंग दाखवून गेल्या स्मृती
जाणीव नेणिवेच्या पलीकडे भेटवून गेल्या स्मृती, तोल ढळता ढळता सावरून गेल्या स्मृती
समोर सावलीशी दिसली बावरून गेल्या स्मृती, तमाची छाया घनदाट उजळून गेल्या स्मृती
वियोगाचा वणवा उरी पेटवून गेल्या स्मृती, ती शेज शरांची होती जगवून गेल्या स्मृती
कोमजले होते आत काही, उमलून गेल्या स्मृती, साथ कधीही सोडणार नाही सांगून गेल्या स्मृती

# प.पू.काशिनाथ जायभाये (बाबा)

यांच्या पुण्यस्मरणानिमित्त

## विनम्र अभिवादन.....!

## अभिवादक : दैनिक लोकनेता परिवार

# भटक्या विमुक्तांच्या दुःखाचे प्रतिबिंब 'वेशीबाहेर' लेखक राजेश भांडे

लोकनेता न्यूज नेटवर्क

स्वातंत्र्याच्या ७७ वर्षानंतरही भटक्या विमुक्त समाजाच्या जीवनात घर, गाव आणि कायमस्वरुपी मुक्काम नसणारा अशा विवंचना भटक्या समाजातील कैकाडी, वडार, डोंबारी, घिसाडी, वैदु, वसुदेव, गोंधळी, उपरे, मसनजोगी, पाथरवट, मांग, गारुडी, बहुरुपी, बंजारा अशा अनेक जाती स्वातंत्र्योत्तर काळातही आपले दु:खाचे जीवन जगताना दिसून येतात. औद्योगिकरण, जागतीकीकरण झाले असले तरी दुर्गम ग्रामीण भागात व शहरी भागात आजही या भटक्या जाती रस्त्याच्या कडेला, रस्त्यावर, गावकुसाच्या बाहेर मुक्काम करुन दररोज पोटासाठी भटकत असतात हे कटु सत्य आपणास नाकारता येणार नाही. सन १९६० नंतर मराठी साहित्याच्या स्थित्यंतरात विविध वाङ्मयीन प्रवाहाचा फार मोठा वाटा आहे. दलित साहित्याच्या प्रवाहानंतर ग्रामीण साहित्य प्रवाहाची चळवळ सुरु झाली या चळवळी नव्याने बदल घडविण्यासाठी अस्तित्वात येत असतात. नव्याने लिहू लागलेल्या सुशिक्षित ग्रामीण तरुणांना व्यासपीठ मिळाले. यातूनच राजेश भांडे हा कवी त्यांच्या पहिलाच 'वेशीबाहेर' हा काव्यसंग्रह मराठवाड्यातील लातूर जिल्ह्यातून आलेल्या भटक्या विमुक्त कवीने आपल्या लेखनीच्या जोरावर एखाद्या मुरलेल्या कवीप्रमाणे त्यांनी बहीणाबाई चौधरी, कुसुमाग्रज, नारायण सुर्वे व ना.धों. महानोर या कविंचा वारसा घेऊन त्यांच्या लेखनीला स्पर्श झालेला दिसून येतो. हा त्यांचा पहिलाच काव्यसंग्रह असून काव्य संग्रहाच्या प्रकाशनार्थ म.रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ यांनी दखल घेऊन हा काव्यसंग्रह प्रकाशन केला ही एक प्रेरणात्मक उत्साहवर्धक घटना दिसून येते.


'वेशीबाहेर' ह्या काव्यसंग्रहातून कवीने ६० कवीतांचा संग्रह केला आहे यामध्ये सामाजिक, राजकिय, कौटूंबिक या विषयाबरोबर प्रेम कविता सुध्दा संग्रहीत आहेत. परंतू प्रामुख्याने जाणवणाऱ्या कवीता म्हणजे भटक्या विमुक्त अशा उपेक्षित राहिलेल्या समाजाचे दु:ख, वेदना, आक्रोश, समाजाच्या वेशीवर त्यांनी टांगले आहे. त्यांनी लिहिलेल्या 'ठिगळं' कवितेतून गावगाड्यात राहणाऱ्या समाजापेक्षाही वेशीबाहेर राहणाऱ्या भटक्या विमुक्त समाजाचे दु:ख खूप वेगळं आहे. दु:ख, दारिद्र्य, वेदना, आक्रोशाला कधी जात नसते. मराठी साहित्याला 'वेशीबाहेर' काव्यसंग्रहाची दखल घ्यावीच लागेल. त्याच बरोबर इथल्या सामाजिक, राजकीय व्यवस्थेलाही भटक्या विमुक्त समाजाच्या प्रश्नांकडे आता गांभीर्याने पहावे लागेल. गावगाड्याने नाकारून पिढ्यांनपिढ्या दु:ख, दारिद्र्य व स्वातंत्र्य न मिळालेल्या लोकांचं दर्शन 'ठिगळं' या कवितेतून कवी समर्पकपणे करतात.

**माझ्या पिढ्यांपिढ्या**
**उसवलेल्या अयुष्याला**
**रोजचं 'ठिगळं' मी लावतो आहे**
**रस्त्याच्या कडेला**
**तीन दगडाच्या चुलीवर**
**रट् रट् माझं जीवन शिजत आहे.**

स्वातंत्र्याच्या ७७ वर्षानंतरही भटक्या विमुक्त समाजाच्या जीवनात स्वातंत्र्याची पहाट झालेली दिसत नाही. रस्त्यावर, रस्त्याच्या कडेला, पुलाखाली, गावकुसाबाहेर राहणाऱ्या कष्ट करून भिक मागून पोट भरणाऱ्या लोकांच्या जीवनाच्या कविता समाजमनाचा पारदर्शक आरसा आहे. या कवीतेतून कवी समाज व्यवस्थेवर टिका करुन सामाजिक, राजकिय न्यायदेवतेकडे न्याय मागताना दिसून येतो. म्हणूनच ते 'वेशीबाहेर' या कवितेत लक्ष वेधून घेतात व शासनकर्त्यांना उद्देशून कविता लिहीतात.

**हे, लोकशाहीच्या राज्यकर्त्यानो**
**गावगाड्याच्या वेशीबाहेर राहणाऱ्या**
**फाटक्या–तुटक्या पालवातून**
**आम्ही अंधाऱ्या आयुष्याचे 'तारे'**
**मोजलेत**
**आता तरी आमच्या पालवात**
**स्वातंत्र्याचा 'सुर्य' उगवू द्या .......**

कवी राजेश भांडे यांनी समाजातल्या शेवटच्या वर्गाचे दु:ख, दारिद्र्य, वेदना, अज्ञान रेखाटताना लिखानात कोठेही कृत्रीमता दिसून येत नाही. एक परिपक्व कवीच्या लेखनीतून शब्दभंडाराची निर्मिती व्हावी अशी सौंदर्यशिल व संवेदनशिलता दिसून येते. कमी शब्दातून जास्त आशय मांडणे, साध्या व सरळ भाषेत अडाणी माणसाला समजेल अशा शब्दातून त्यांनी 'आसूड'




या कवितेतून पोतराजांच्या जीवनाचे वर्णन केले आहे. आजही विशेषत: शहरी भागात पोतराज व त्यांचे कुटूंब रस्त्यावर वाद्य वाजवून व आसूड हातात घेऊन शरीराभोवती रंगीबेरंगी फाटके तुटके ठिगळांचे कपडे परिधान करून आपल्या गरीबी, दारिद्र्य अज्ञानाचे जीणं रस्त्यावर भिक मागतानाचे चित्र 'आसूड' या कवीतेतून कवी करतो आहे –

**आई लक्ष्मी डोक्यावरती**
**लक्ष्मी माझी अर्धपोटी**
**बाळ छोटं तिच्या पाठी**
**दारी नाही अक्षर पाटी**

ग्रामीण चळवळीमध्ये उपेक्षित घटकांना समाजासमोर आणण्याचे काम साहित्यिक करत असतो. याचा एक भाग म्हणून कवी राजेश भांडे यांनी आजच्या लोकशाहीत स्वातंत्र्यवीरांच्या, समाजसेवकांच्या पुतळ्याचे जातीय राजकारण केले जाते. त्यांचा उपयोग करुन स्वत:चा स्वार्थ राजकारणी करत असतात. चौका चौकात थोर महात्म्यांचे पुतळे उभे करताना त्यांची चढाओढ असते. परंतू राजकारणासाठी जातीय संदर्भ घेऊन अनेक ठिकाणी पुतळे उभारणी केली जाते, पण त्या महात्म्यांचा आदर्श घेण्याऐवजी आजची तरुण पिढी वेगळ्या वर्तनाच्या वळणावर आपणास दिसून येते. कवी कुसूमाग्रज यांच्या 'पुतळे' या कवितांचा संदर्भ लक्षात घेता कवीने 'आमच काय चुकलं ?' या कवीतेतून समाजकारण, राजकारण, जातीय तेढ या बाबीवर समाचार घेतला आहे.

**'आज आमचे पुतळे**
**तुमच्या राजकारणासाठी,**
**समाजकारणासाठी**
**रस्त्यांच्या मध्ये कर्कश आवाजात**
**कावळ्यांच्या विष्ठेसाठी**
**आमच्या गळ्यात चप्पलाहार**
**दंगली घडविण्यासाठी**
**आमच्या जयंत्या**
**तुमच्या अस्तित्त्वासाठी**
**मतांच्या पेटीसाठी**
**आणि तुमच्या रात्रीच्या दारुसाठी'**

भटक्या विमुक्तांच्या समाजापैकी 'डोंबारी' नावाची जात आजही आपणास रस्त्याच्या कडेला, रस्त्यावर डोंबाऱ्याचा खेळ करताना दिसून येते. डोंबारी ही तारेवरची कसरत करुन पोटाची खळगी कायमस्वरुपी उपाशीच राहणारी व जीव मुठीत घेऊन तारेवर कसरत करणारा जीव शरीराला आतोनात कष्टप्राय ताण देऊन आपली पारंपारिक कला सादर करताना दिसतो आहे. जीवाची पर्वा न करता रस्त्यावर हा खेळ चाललेला असतो. त्यातूनच तो रुपया दोन रुपये घेऊन पोटाची भूक भागवित असतो. या देशातील पुरोगामी लोकशाहीत डोंबारी बंड करून उठतो व इथल्या समाज व्यवस्थेला, शासन प्रणालीला अन्न, वस्त्र, निवारा या जीवन जगताना मुलभूत गोष्टी सुध्दा स्वातंत्र्याच्या ७७ वर्षात इथं मिळत नाहीत. म्हणून डोंबारी या कवितेत राज्य व्यवस्थेला प्रश्न विचारताना दिसतो आहे. ही एक मोठी स्वातंत्र्याची शोकांतीका आहे म्हणून कवि डोंबारी या कवितेत म्हणतो :

**माझं जिणं उपेक्षिताचं**
**ना सासर ना माहेर**
**रस्त्यावरच चाले माझा**
**जन्म मृत्यूचा खेळ**
**कोणीतरी म्हंटलं**
**देश स्वतंत्र झाला**
**का नाही मिळतं इथं**
**अन्न, वस्त्र, निवारा**

'वेशीबाहेर' मधील हमाल, माथेर, सगळे कसे मुरदाड झालेत साले !, नवा लढा, वेठबिगारी, नामांतर, जागर या कविता काव्यसंग्रहात वाचकाचे लक्ष वेधून घेतात व वाचकाला विचार करायला लावतात. हमाल कवितेत तर कवी लिहितो

**गांधी ! स्वांत्र्याचा उपभोग कोण घेतो आहे**
**बाबा ! माझे मरण येथे रोज होत आहे.**

'वेशीबाहेर' या कविता संग्रहाच्या शेवटी 'क्रांती' ही कविता समारोपाला साजेल अशी असून कवीनी या कवितेतून इंग्रजाच्या चांगल्या गोष्टीचा उल्लेख केलेला आहे. ही कविता अधिक समर्पक आहे. कोणत्याही विधायक कार्यासाठी समारोप फार महत्त्वाचा असतो. म्हणजेच समारोपाला एका ठाम निर्णयापर्यंत येणं फार महत्त्वाचं असतं. सगळ्याच पातळ्यावर अहिंसावादी लढलेल्या दिनदुबळ्यांना आता क्रांतीचेच शस्त्र सावरू शकेल अशा कवीच्या 'क्रांती' या कवीतेतून कार्यप्रवाही करायला पूरेसा आहे म्हणून कवी म्हणतात–

**बरे झाले या देशात इंग्रज आले**
**शिक्षणाच्या प्रसारामुळे अक्कल आली**
**गुलामांना गुलामीची जाणीव झाली**
**मातृभूमीच्या प्रेमापोटी क्रांती झाली.**

सभोवतालच्या सामाजिक स्थितीचे चित्र भयावह आहे. हे बदलले पाहिजे ज्यासाठी काहीतरी करण्याच्या प्रबळ इच्छेतून त्यांची लेखणी पुढे सरसावते. जागतिकीकरणाने जगाचे, जगण्याचे सर्व संदर्भ बदलून टाकले आहे. हे बदल केवळ आर्थिक जगण्याशी नसून ते सामाजिक, सांस्कृतिक, भाषिक, वाङमयीन, धार्मिक आदि क्षेत्रामध्ये तितकेच परिणाम कारक आहेत. सर्व क्षेत्रात प्रस्तापित मुल्ये होती ती मूल्यव्यवस्था सुध्दा मोडीत निघालेली आहेत. एकूणच समाजाच्या सर्व बाबींवर दूरगामी परिणाम झाले आहे.

कवीच्या कवितेत अनावश्यक प्रतीके आणि प्रतिमांची भाऊगर्दी नाही, त्यांची कविता शब्दबंबाळ व क्लिष्ट नाही. मनातल्या भाव भावनांचे प्रामाणिकपणे केलेले प्रकटीकरण आहे. या सर्व बाबीचे प्रतिनिधीत्व कवींच्या सर्व कविता करतात. कवी राजेश भांडे यांच्या आगामी वाङमयीन कृती निर्मितीला मन:पूर्वक शुभेच्छा देतो!


**पुस्तक परीक्षण– डॉ रमेश शेळके, लातुर**
**९४२२७१८१७१**

## समाजाच्या मागणीला मा.आ.वसंतराव चव्हाण दिले सात लक्ष,पण सभागृहाकडे झाले नाभिक बांधवांचे दुर्लक्ष

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । माधव बैलकवाड**





नायगाव शहरासह तालुक्यातील नाभिक समाज बांधवांना वारंवार वाटत होते की, तालुक्याच्या ठिकाणी श्री संत सेना महाराज मंदिर असावे, ही मागणी जोर धरीत समाजाने बैठक घेऊन एखाद्या कार्यक्रमांचे आयोजन करून आपला लोकप्रतिनिधी आमदार वसंतराव चव्हाण यांच्याकडे २०१९ रोजी सदर मंदिराची मागणी घातली त्या मागणीला होकार देत आ. वसंतराव चव्हाण यांनी आपल्या निधीतील सात लक्ष रुपयाचे सांस्कृतिक सभागृह बांधून दिले पण आज त्या सभागृहात कचऱ्याचे साम्राज्य पसरले आहे कारण समाजाचे दुर्लक्ष का व कशामुळे झाले असावे हा प्रश्न आहे.

अलीकडील काळात प्रत्येक जातीत आपल्या जातीच्या उत्थानासाठी अनेक सामाजिक संघटना जन्मास आले आहेत. नाभिक समाजातही महाराष्ट्र नाभिक महामंडळ,अखिल भारतीय जीवा सेना आणि अखिल भारतीय कर्मचारी जीवासेना या तीन तरी नायगाव तालुक्यात संघटना कार्यरत असलेल्या दिसून येतात पण समाजाचा ताळमेळ नसला की कोणतीही चांगली गोष्ट पुढे येत नाही तसे पाहिले तर अनेक समाजात मरगळ आलेली दिसून येते, नाभिक समाजातल्या सदर संघटनेच्या वतीने श्री संत सेना महाराज जयंती पुण्यतिथी शूरवीर शिवरत्न जीवा महाले जयंती पुण्यतिथी व समाज चर्चासत्र बैठक असे अनेक कार्यक्रम होत होते त्यापैकी मी काही कार्यक्रमातला साक्षीदार आहे. समाजातल्या विविध कार्यक्रमातून समाज बांधवाकडून तालुक्याच्या ठिकाणी श्री संत सेना महाराज मंदिर असावे ही मागणी पुढे आली आपले लोकप्रतिनिधी आ. वसंतराव चव्हाण यांच्याकडे सदर मंदिराची मागणी २०१९ मध्ये घालताच त्यांनी आपल्या निधीतील सात लक्ष रुपयाचे सांस्कृतिक सभागृह २०१९. २० मध्ये नायगाव वाडी येथील अमृत नगर येथे बांधकाम झाले असलेले समाजाचे मंदिर जसे की समाजाने त्याला आज वाळीत टाकावे अशा अवस्थेत ते आहे दारे खिडक्या उघडे, रिकामी दारूच्या चोहीकडे बाटल्या, प्लास्टिक पाणी ग्लास, पाणी पाऊच पाकिटे सिगारेटचे तुटुके मटक्याच्या पुड्या अशा कचऱ्याचे आज साम्राज्य तिथे पसरले आहे ज्या सभागृहाला श्री संत सेना महाराज मंदिर असा दर्जा आपण देणारे त्या थोर संताचा किती अपमान हे समाजाला अपमानास्पद का वाटू नये, समाज आपला पारंपारिक व्यवसायामध्ये मग्न असला तरी चालेल पण विचाराचा अभाव असला की समाजात आदर्श गोष्ट पुढे येत नाही, समाजबांधवांनी दर सोमवारी आपला व्यवसाय बंद ठेवतात,तर कर्मचारी बांधवांना रविवारी सुट्टी असते मग आमची मानसिकता पुढे आली तर सभागृह स्वच्छ करता येणार नाही का ? तिथे झाडे लावता येणार नाहीत का? बाजूने तीन पत्राचा शेड उभारता येणार नाही का ? अभ्यासिका प्रेरणास्थळ म्हणूनही करता येते कारण स्वर्ग कुठेच नाही ते आपणास निर्माण करावे लागते, कारण आपला स्वाभिमान जागा झाला तरच आपण चांगले पाऊल उचलतो तेव्हाच इतर समाजापुढे आदर्श उभा राहतो एवढे नक्की.

## मौजे हिंदोळा येथे अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याला सुरुवात

लोकनेता न्यूज नेटवर्क

**कापसी । बालाजी पा.शिंदे**





मौजे हिंदोळा ता. लोहा जि. नांदेड येथे श्री गुरूकृपे करून फाल्गुन शु. १४ गुरूवार दि.१३.०३.२०२५ ते फाल्गुन कृ.६ गुरूवार दि.२०.०३.२०२५ पर्यंत अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा संपन्न होणार आहे. सकाळी पहाटे ४ ते ६ काकडा आरती, ६ ते ९ ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण १० ते १२ गाथा भजन दुपारी २ ते ४ तुकाराम महाराज चरीत्र सायं. ५ ते ६ हरीपाठ रात्री ८ ते ११ हरी किर्तन सन्मानीत अष्टकौशल्य महंत प्रयागगिरीजी महाराज प्रयागराज आश्रम डोलारा श्री ह.भ.प. भागवताचार्य मधुसुदन महाराज भक्ताश्रम हिंदोळा/करमाळा. दि.१७/०३/२०२५ सोमवार किर्तनकार ह.भ.प.डॉ. दत्ता महाराज वळशिंगवाडी वेळ:रात्री ८ ते ११ वा. दि.१८/०३/२०२५ मंगळवार किर्तनकार ह.भ.प. शिवचरित्रकार भाग्यश्रीताई मोहिते परभणीकर वेळ रात्री ८ ते ११ वा. दि.१९/०३/२०२५ बुधवार किर्तनकार श्री ह.भ.प.शंकर महाराज लोंढे सोनमांजरीकर वेळ राबी ८ ते ११ वा. दि.२०/०३/२०२५ गुरुवार किर्तनकार श्री ह.भ.प. भागवताचार्य मधुसूदन महाराज कात्याचे किर्तन वेळा सकाळी १० ते १२ वा. दि.२०.०३.२०२५ गुरूवारी सकाळी १० ते १२ मधुसूदन महाराज यांचे काल्याचे किर्तन होईल. व लगेच महाआरती नंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.भजनी मंडळी कापशी (बु) करमाळा, पिंपळदरी, गोळेगाव, डोलारा, मारतळा, कामळज, उमरा, वाका, कौडगाव वाळकी (बु) वाळकी (खु.) जोमेगाव तरी सर्व भाविक भक्तांनी अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याला उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे समस्त गावकरी मंडळी हिंदोळा ता.लोहा जि.नांदेड यांनी कळविले आहे.

## चिंचोली येथील शेतकऱ्यांने काढले २५ गुंठ्यांत ३५ क्विंटल हळदीचे विक्रमी उत्पादन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**आंबुलगा । सुर्यभान बिजलगावे**



चिंचोली येथील शेतकरी सुर्यकांत रघूनाथ पा लांबाटे मु चिंचोली ता कंधार जि नांदेड यांनी सांगितली हळदीच्या विक्रमी उत्पादन वाढण्यासाठी केलेले कष्ट शेण खत पाच ट्रक्टर टाकले व मशागत ट्रक्टर आणि बैलाच्या साह्याने चार पाच वेळस मशागत केली व बेडवर हळद मे महिन्याच्या १५ तारखेला लावून व श्रद्धा अँग्रो बायो चे औषध व किट वापरली ड्रिप मधुन १२६१, १३०४५ व पोट्याश खत सोडला व हळद वाढ जास्त होऊ नये या साठी कुलटर औषध सोडले व फवारणी ड्रोन च्या साह्याने केली व हळद ट्रक्टर च्या साह्याने काढणी करुन घेतली त्यामुळे २५ गुंठे जमीनीत ३५ क्विंटल हळदीचे उत्पादन काढून विक्रम मिळविले आहे.

## ग्रामीण शिक्षण वाचवा,विद्यार्थ्यांचे भविष्य घडवा!

लोकनेता न्यूज नेटवर्क

**आर्णी । अनिकेत खारोळ**

ग्रामीण भागातील शिक्षणव्यवस्थेचा पाया मजबूत करण्याऐवजी शासनाच्या धोरणांमुळे ती अधिकच कमकुवत होत आहे. जिल्हा परिषद शाळांमध्ये शिकणाऱ्या लाखो गोरगरीब, शेतकरी, वंचित, दलित आणि आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांसाठी हा मोठा धक्का आहे. शासनाच्या संचमान्यता धोरणामुळे अनेक जि.प. शाळा बंद होण्याच्या मार्गावर असून शिक्षक संख्येत कपात केली जात आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारमय होत आहे. ग्रामीण भागात अनेक शाळांमध्ये वर्गाच्या तुलनेत शिक्षकांची संख्या कमी आहे. अशाही परिस्थितीत शिक्षक गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचा प्रयत्न करत आहेत. शिक्षणक्षेत्रात सातत्याने उपक्रमशील राहणारे शिक्षक शासनाच्या अशैक्षणिक कामांमध्ये अडकले जात आहेत. परीक्षांच्या काळात क्षमतावृद्धी प्रशिक्षण घेतले जात असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.

**दरवर्षी शिक्षक आणि विद्यार्थ्यांसमोर तीच समस्या**

प्रत्येक शैक्षणिक वर्षात ग्रामीण भागातील शाळांना शिक्षक, वर्गखोल्या आणि मूलभूत सुविधा यांचा अभाव जाणवतो. वर्ग १ ते ४ ची विद्यार्थ्यांची संख्या २० पेक्षा कमी असली, तरी प्रत्येक इयत्तेचा अभ्यासक्रम वेगळा असतो. परिणामी, एकाच शिक्षकावर अनेक वर्ग आणि विषय शिकवण्याची जबाबदारी येते. जर प्रत्येक इयत्तेसाठी स्वतंत्र शिक्षक आणि वर्गखोली दिली गेली नाही, तर ग्रामीण भागातील शिक्षणाचा दर्जा सुधारू शकणार नाही. ग्रामीण शिक्षण वाचवण्यासाठी पुढे येण्याची गरज आहे ग्रामीण शिक्षण सक्षम करायचे असेल तर संचमान्यता धोरण तत्काळ रद्द करण्यात यावे आणि वर्गखोल्या प्रमाणे शिक्षक द्यावे . अन्यथा, भविष्यात खासदारांच्या मुलांची खासदार, आमदारांच्या मुलांची आमदार, आणि कर्मचारी वर्गाच्या मुलांची सरकारी नोकऱ्यांमध्ये वर्णी लागेल. मात्र, शेतकऱ्यांची मुले पुन्हा शेतीतच अडकून राहतील ग्रामीण शिक्षण वाचवा, विद्यार्थ्यांचे भविष्य घडवा! शासनाने वेळीच जागे होऊन ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्था वाचवण्यासाठी पावले उचलली नाहीत, तर शिक्षणतज्ज्ञ, पालक, आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन आवाज उठवण्याची गरज आहे. अन्यथा, ग्रामीण शिक्षणाची वाताहत होऊन लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात येईल.

**(छत्रपती जनार्दन गजभिये, पी.एम., श्री जि.प.प्राथमिक शाळा, लोणी, पं.स. आर्णी, जि. यवतमा)**

# केंद्रीय मानवाधिकार संगठन नई दिल्लीच्या वतीने बाल कलाकार अश्विनकुमार यास संविधान गौरव पुरस्कार!

लोकनेता न्यूज नेटवर्क

**गोळेगाव ।प्रतिनिधी**

दि. १५-०३-२०२५ रोजी मौजे गोळेगाव, तथा. बोदवड, जिल्हा जळगाव पू. खा. शेजारील श्री.गजानन महाराज मंदिर परिसरातील उद्यानात आयोजित केंद्रीय मानवाधिकार संगठन, नई दिल्ली च्या प्रादेशिक अधिवेशन - २०२५ तथा पुरस्कार वितरण सोहळ्यामध्ये, चिखली (खडकपुरा ), ता. चिखली, जि. बुलढाणा येथील, वयाच्या पाचव्या वर्षापासून शिक्षणाबरोबरच कलेच्या क्षेत्रात आपल्या इवल्याशा बोटांनी तबल्याशी जोडलेले नाते जोपासत तथा फुले - आंबेडकरी विचारधारेच्या व संवैधानिक स्वरूपाच्या कार्यक्रमांमधून प्रबोधन व जनजागृतीचे पवित्र राष्ट्रीय कार्य करणाऱ्या बाल कलावंत मास्टर अश्विनकुमार अविनाश वेंडोले यास बहुमानाच्या संविधान गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात. संगठनचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. डॉ. मिलींद दहीवले, नई दिल्ली यांच्यासह राष्ट्रीय कार्याध्यक्ष तथा सामाजिक सेवाभावी कार्यास्तव अमेरिकेतील विद्यापीठाकडून मानद डॉक्टरेट प्राप्त डॉ.ड. विजयकुमार कस्तुरे, चिखली, राष्ट्रीय संगठन सचिव तथा साहित्यिक प्रभावी कथाकथनास्तव अमेरिकन विद्यापीठातर्फे मानद डॉक्टरेट पदवीने सन्मानित डॉ. बबनराव महामुने, छ. संभाजीनगर, उपाध्यक्ष जनाब बशीर शेख, मुंबई, महाराष्ट्र राज्य पदाधिकारी डॉ. पंकज इंगळे, जळगाव, डॉ. अमर कुमार तायडे, नवनिर्वाचित वरिष्ठ उपाध्यक्ष मा. रविंद्र काशिनाथ सोनार, गोळेगाव आणि डॉ. डी.व्ही. खरात इ. मान्यवरांच्या हस्ते सदर पुरस्कार सन्मानपत्र, शाल व पुष्पगुच्छ प्रदान करून कुमार अश्विनचा गौरव करण्यात आला. महत्त्वाचे म्हणजे कुमार अश्विनच्या वडीलांची आजी दिवंगत सोनाबाई वेंडोले यांचेही नांव त्यांच्या भजन-दिंडी- वारी मध्ये तसेच मुक्ताई नगरहून पंढरपूरला तत्कालीन जाणाऱ्या पालखी सोबत खंजिरी व झ्यांज ही पारंपारिक वाद्ये वाजवीत भजने,अभंग तथा भक्ती गीत गाण्यासाठी व पंचक्रोशीतील सर्व जनतेच्या सुखदु:खात मदत व सहकार्य करण्यासाठी प्रसिद्ध होते. विशेष म्हणजे गेली पासष्ट वर्षे ड. विजयकुमार कस्तुरे यांच्या अध्यक्षतेखाली भजन गीताद्वारे अविरत प्रबोधनाचे कार्य करणाऱ्या चिखली येथील सुप्रसिध्द पंचशील भजनी मंडळाच्या त्या एक सदस्य होत्या. तसेच त्यांचे चिरंजीव अर्थात अश्विनचे आजोबा नारायण वेंडोले सुध्दा भजनी मंडळ गायक कलाकार होते. असा कौटुंबिक वारसा घेऊन या बाल कलावंताने संवैधानिक प्रबोधन क्षेत्रात मारलेल्या या यशस्वी भरारीमुळे सर्व स्तरांमधून त्याचे हार्दिक अभिनंदन होत असून पुढील यशवंत वाटचालीसाठी त्याच्यावर शुभेच्छांचा सुध्दा वर्षाव होत आहे.



# अंगणवाडी सेविकांसाठी आनंदाची बातमी मंत्री आदिती तटकरेंकडून महत्त्वाची घोषणा



लोकनेता न्यूज नेटवर्क

**मालेगाव । संदीप कदम**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचे अर्ज भरणाऱ्या अंगणवाडी सेविका व पर्यवेक्षिकांना प्रति अर्ज ५० रुपये प्रोत्साहन भत्ता देण्याचा निर्णय शासनाने घेतला होता .यासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्यात आली असून निधी वितरणाची प्रक्रिया क्षेत्रीय स्तरावर सुरू असल्याची माहिती महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी विधानसभेत दिली.विधानसभा सदस्य रोहित पवार आणि वरूण सरदेसाई यांनी यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होताया योजनेच्या अंमलबजावणीसाठी अंगणवाडी सेविकांना व पर्यवेक्षिका यांनी पात्र उमेदवारांचे अर्ज भरले होते.

त्यांना प्रोत्साहन भत्ता देण्यासाठी ३१.३३ कोटी रुपये इतका निधी वितरित करण्यात आला आहे.दरम्यान, या भत्त्याच्या वितरणाची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरू आहे आणि लवकरच अंगणवाडी सेविका आणि पर्यवेक्षिकांना लाभ मिळेल असे मंत्री आदिती तटकरे यांनी विधानसभेत सांगितले.

## नांदेड-हैदराबाद रोड देगलूर येथिल मदनुर नाक्यांवरील होणारे

# अपघात टाळण्यासाठी,गोलाई सर्कल उभारण्या करती सा.बा.बांधकाम विभाग अस्वस्थ का ?

## धनाजी जोशी यांचा नायगाव येथील उपविभागीय अभियंता बारडकर साहेब यांना सवाल?

लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । धनाजी जोशी**



नांदेड हैद्राबाद हायवे,मदनुर नाका देगलूर जि नांदेड

हैदराबाद हायवे वर देगलूर शहरातील मदनुर नाका चौस्त्यावर अनेक वाहनाची समोरासमोर धडक होऊन अनेक बळी जात असल्यामुळे त्या चौकात एक गोल सर्कल उभारण्यात यावा यासाठी धनाजी मनोहरराव जोशी मराठवाडा अध्यक्ष राष्ट्रीय ओबीसी फाउंडेशन यांनी निवेदनाद्वारे सार्वजनिक बांधकाम विभाग देगलूर मार्फत सार्वजनिक बांधकाम विभागाचे नायगाव येथील उपविभागीय अभियंता बारडकर साहेब यांना दिले.नांदेड हैदराबाद जाणारे व देगलूर शहरात प्रवेश करते वेळेची वाहणे व तेलंगणा राज्यातून व कर्नाटक राज्यातून येणारे व जाणारे येणारी वाहणे तसेच शहरातून नगर पालिका व शिवाजी पार्क समोरुन येणारी वाहणे ही मदनुर नाका चौकातून जाता येता.अनेकदा अमोरा समोर वाहनांची धडक होत असल्यामुळे त्या ठिकाणी अनेकदा वाहनामध्ये व नागरिकांमध्ये वाद सुध्दा झाले आहेत अनेक निष्पाप नागरिकांचा बळी गेले असुन, मदनुर नाका चौरस्ता हा मृत्यूचा सापळा बनला असून यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी लवकरात लवकर चौकामध्ये गोलाई सर्कल करणे अंत्यंत गरजेचे आहे संबंधित अधिकाऱ्याने हा विषय गांभिर्याने घेऊन त्या ठिकाणीं लवकरात लवकर गोलाई सर्कल बनवण्यात यावा अन्यथा २४ ऑगस्ट २०२४ रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग देगलूर कार्यालया समोर अमोरण उपोषण करण्यात इशारा धनाजी मनोहरराव जोशी मराठवाडा अध्यक्ष राष्ट्रीय ओबीसी फाउंडेशन यांनी असे निवेदन दिले असता, नायगाव येथील उपविभागीय अभियंता बारडकर साहेब यांनी २३ऑगस्ट रोजी पत्राद्वारे उपोषण मागे घेण्यासंदर्भात पत्र पाठवून कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून असे सांगितले,सदरिल प्रकरणात याविषयी सहा महिने लोटुन सुध्दा कुठलीच कारवाई झाली नसुन धनाजी जोशी यांनी दि १५/३/२०२५ रोजी नायगाव येथील उपविभागीय अभियंता यांना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मार्फत स्मरण पत्र पाठवून काम लवकरात लवकर चालू करण्या संदर्भात पत्र देऊन कामाला सुरुवात न केल्यास आमरण उपोषणाचा इशारा धनाजी जोशी यांनी दिले.

# एसटी महामंडळाची बस सकाळच्या वेळात बदल करा-पालकांची मागणी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । जयपाल दावनगीरकर**

देगलूर ते भोकसखेडा एसटी महामंडळाची बस सेवा शाळकरी विद्यार्थ्यांसाठी वेळापत्रक बदल करून तीच बस एका तासाने उशिरा चालू केल्यास शाळकरी विद्यार्थ्यांचे गैरसोय दूर होईल अशी मागणी विद्यार्थी पालक वर्गाकडून जिल्हाधिकारी यांना लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

देगलूर तालुक्यातील मौजे भोकसखेडा, बळेगाव, कावळगाव या ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमध्ये सातवी पर्यंतचे शिक्षण असल्याने पुढील शिक्षणासाठी विद्यार्थी पाठीवर ओझे घेऊन दररोज ये - जा करण्यासाठी तालुक्याचा रस्ता गाठावा लागत आहे. देगलूर ते भोकसखेडा सकाळी ७:३० वाजताची एसटी बस सुरू असलेल्या बस वेळापत्रकात बदल करून हिच बस ८:३० वाजता सुरू करण्यात यावे व तसेच दुपारी १:०० व सायंकाळी ४:३० वाजताची बस सेवा जशास तसे सुरळीत चालू असून ति बस सुध्दा कधीतरी वेळेवर येत नसल्याने शाळकरी विद्यार्थी विद्यार्थिनींना खुप त्रास सहन करावा लागत आहे. शाळकरी व महाविद्यालयीन विद्यार्थी विद्यार्थिनींना त्यांच्या शैक्षणिक कार्यकाळापर्यंत बस सेवेचे पास काढून वाया जात आहे. कारण की हिवाळ्या दिवसात थंडीचे वातावरण असल्याने शाळेच्या वेळेत शाळा उशिराने उघडत असल्याने विद्यार्थ्यांना जवळपास दीड ते दोन तास ताटकळत शाळेसमोर बसून शाळा उघडण्याची प्रतिक्षा करावी लागत आहे.एसटी महामंडळाची बस सेवा तिन वेळेस सुरळीत चालू असलेल्या गाड्या वेळेवर सोडवून सकाळची बस सेवा ही ठीक ८:३० वाजता सोडण्यात यावे जेणेकरून विद्यार्थी वेळेवर शाळेत अथवा महाविद्यालयात पोहोचू शकतील अशी विनंती २५ ते ३० पालकांच्या स्वाक्षरीने मा.जिल्हाधिकारी नांदेड, मा. विभागीय वाहतूक अधिकारी नांदेड यांना लेखी निवेदनाद्वारे विनंती केलेली आहे.

# हा सन्मान माझा नसून शिराढोण केंद्रातील मुख्याध्यापकांचा व शिक्षकांचा सन्मान-प्रवीण पाटील

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड ।दौलत पांडागळे**

शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा (SQAAF)या उपक्रमात शिराढोण केंद्राने जिल्ह्यात आघाडी घेतली असल्यामुळे नांदेड जिल्ह्याचे माध्यमिक शिक्षणाधिकारी मा. माधव सलगर साहेब व मा. दिलीपकुमार बनसोडे साहेब शिक्षणाधिकारी (योजना ) जि प नांदेड यांनी मा.संजय येरमे साहेब, गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती कंधार, मा. सतीश व्यवहारे साहेब गटशिक्षणाधिकारी लोहा , शिक्षण विस्तार अधिकारी श्री वसंत मेटकर साहेब,सौ. अंजली कापसे मॅडम, श्रीमती अंबलवाड मॅडम यांच्या उपस्थितीत माझा सन्मान करून भावी कार्यास शुभेच्छा दिल्या माझा सत्कार हा माझा नसून माझ्या केंद्रातील मुख्याध्यापकांचा व शिक्षकांचा आहे या यापूर्वी शिराढोण केंद्रातील शिक्षकांनी महावाचन, नवभारत साक्षरता कार्यक्रम , अपार आयडी, अध्ययन स्तर निश्चिती, शोध प्रज्ञांचा सन्मान गुणवंताचा विद्यार्थी लाभाच्या योजना यासारख्या अनेक उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला आहे.या पुढे ही माझ्या केंद्रातील सर्व मुख्याध्यापक व शिक्षक उत्कृष्ट कार्य करतील याची मला खात्री आहे निपुण महाराष्ट्र या उपक्रमामध्ये सुद्धा शिराढोण केंद्र आघाडीवर राहील.यावेळी लोहा आणि कंधार तालुक्यातील सर्व केंद्रप्रमुख,विषय तज्ञ, लोहा तालुक्यातील माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुरेख संचलन केंद्रप्रमुख सुभाष पानपट्टे सरांनी केले.



# पाच वर्षात रस्त्यासह जल सिंचनाला प्राध्यान-आ.प्रतापराव पाटील चिखलीकर

## धोंड प्रकल्प ५ वर्षात पुर्ण करणार; अंतेश्वर बंधाऱ्यातून पाणी जाऊ देणार नाही

लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**

पाच वर्षीत दळणवळणा ची सुविधा व्हावी रस्ते आरोग्य शिक्षण यासह जल सिंचनासाठी प्रयत्न दुरु राहणार असून येत्या काळात धोंड प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी पाठपुरावा राहणार आहे जेणेकरून या भागात शेती सिचनासाठी त्याचा उपयोग होईल.आपण नेहमीच जाती विरहित राजकारण केले कधीच जातीभेद केला नाही आणि करणार नाही आपला हात -घडी के साथ असावा असे अहवान आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले

लोहा तालुक्यातील बेरळी ते देऊळगाव फाटा या १६२.१७ लक्ष रुपये निधी खर्चून रस्ता होणार आहे त्याचे भुमिपुजन शनिवारी (१५ मार्च) आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते देऊळगाव येथे करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष देऊळगाव चे सरपंच मारोतराव सोनवळे होते प्रमुख पाहुणे म्हणून , माजी नगराध्यक्ष कल्याण सावकार सुर्यवंशी,माणिकराव. मुकादम, राकॉ पार्टी कंधार तालुकाध्यक्ष मनोहर पाटील भोसीकर, राकाँ पार्टी तालुकाध्यक्ष छत्रपती स्वामी, माजी सभापती अशोक पाटील मुगावकर, ,माजी जि प सदस्य हंसराज पाटील बोरगावकर मा. उपनगराध्यक्ष दत्ता वाले, केशवराव मुकदम, बाबाराव पाटील गवते, साहेबराव काळे, पंचशील कांबळे, मारोती पाटील बोरगावकर, उद्धवराव पाटील सूर्यवंशी, खशाल पाटील पांगरीकर, हरिभाऊ चव्हाण, भास्करराव पवार, वीरभद्र राजुरे, अविनाश पाटील सूर्यवंशी, भानुदास पाटील पवार व, बी.डी.जाधव, दिनेश तेललवार,प्रभाकर टाले सरपंच रघुनाथराव सोनवळे, चेअरमन डी.एस.सोनवळे, बाबुराव सोनवळे, चेअरमन रमेश केरबाराव सोनवळे, उपसरपंच श्रीराम राऊत, प्रशांत सोनवळे, माजी ईश्वरराव राऊत, रंगराव जोंधळे, विरभद्र राजुरे बी.डी.जाधव, ,भानूदास पाटील पवार, आदींची उपस्थिती होते.आ. प्रतापराव पाटील चिखलीकर म्हणाले की, देऊळगाव -बेरळी हा रस्ता होण्यासाठी पुम्हा मलाच आमदार व्हावे लागले.आज त्या रत्याच्या कामाची सुरुवात झाली असे सांगूनधोंडे प्रकल्पाचे काम।पाच वर्षात पूर्ण करू जेणेकरून या भागाला सिंचनाची सोय होईल रस्ते आरोग्य शिक्षण सिचन या कामाना प्राधान्य असेल अंतेश्वर बंधाऱ्यातून एक थेंब पाणी अन्यत्र जाऊ देणार नाही असे सांगून जातीवाद खूप झाल्याचे निवडणूक काळात अनुभवले आपण कधीच जातिवाद केला नाही आणि करणार नाही सगळ्याच जाती धर्माचे लोक माझ्या अडीअडचणीत सुख दुःखात येतात पुन्हा जि.प.,पं.स.च्या निवडणुकीत तुमच्याकडे मतदानासाठी येयाचे आहे. मला सर्व जाती धर्माच्या लोकांनी मतदान केले पुढेही तुमच्या सर्वांचे सहकार्य पाहिजेत विकास कामे होतील निधी कमी पडणार नाही असे आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनीसांगितले यावेळी माणिकराव मुकदम हंसराज पाटील तसेच मान्यवरांची भाषणे झाली. सुत्रसंचलन बी.डी. जाधव यांनी केले. तर आभार भानुदास पाटील पवार यांनी मानले. देऊळगाव चे सरपंच मारोतराव सोनवळे यांच्यासह अनेकांनी आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी कॉंग्रेस ,मध्ये प्रवेश केलाकेरबा सोनवळे,प्रमोद सोनवळे,माधव साहेब, शिवानंद सोनवळे, बालाजी राऊत, रमाकांत सोनवळे, प्रभाकर राऊत,जयंत सोनवळे, श्रीनिवास सोनवळे,कामाजी सोनवळे, भाऊराव राऊत आदी कार्यकर्त्यांचा समावेश आहे.



# दौंड पंचायत समितीचे दोन आणि जिल्हा परिषदेचा एक अधिकारी एसीबीच्या जाळ्यात

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पुणे । बबनराव धायतोंडे**

पुणे जिल्हा परिषदेच्या दालनात भ्रष्ट कारभाराचा बुरखा फाटला असून,सार्वजनिक बांधकाम विभागात ठेकेदाराच्या कामाचे बिल काढण्यासाठी मागितलेल्या पैशाने त्यांचा कारभार लाच लुचपत विभागाने अधिकाऱ्यांना रंगेहात पकडल्याने मोठी खळबळ उडाली आहे.

**अतिरिक्त मलिदा खाने आले अंगलट**

१) बाबुराव कृष्णा पवार वय (५७) कार्यकारी अभियंता(दक्षिण) पुणे जिल्हा परिषद पुणे (वर्ग १),२) दत्तात्रय भगवानराव पठारे (वय ५५) उपअभियंता बांधकाम विभाग जिल्हा परिषद पुणे ( उपविभाग पंचायत समिती दौंड,शिरूर) (वर्ग १) ३) श्रीमती अंजली प्रमोद बगाडे कनिष्ठ अभियंता जिल्हा परिषद पुणे (उपविभाग दौंड)(वर्ग ३) यांचा यात समावेश आहे. बुधवार दि १३ रोजी सायंकाळी हा प्रकार जिल्हा परिषदेच्या दालनांत घडल्याने विकासाच्या नावाखाली अधिकारी लूट कोणत्या मार्गाने करतात याचा हा भक्कम पुरावा मिळालाआहे.

होळी सणाच्या मुहूर्तावर भ्रष्ट कारभाराची बोंबा-बोंबच या निमित्ताने झालेली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की दौंड तालुक्यातील गलांडवाडी गाव येथील एका विकास कामाचे टेंडर तक्रारदार प्रविण शिवाजी कदम यांनी घेतलेले होते,चाळीस लाखांचे त्यांचे बिल सार्वजनिक बांधकाम विभागाकडून येणे होते हे बिल काढण्यासाठी या तीन अधिकाऱ्यांनी टक्केवारी प्रमाणे पैशाची मागणी केली होती अखेर तडजोड करायची म्हणून ७८ हजार रुपये देऊन बिल काढण्याचा फार्मूला ठरला.आणि हाच फार्मूला या बिल काढण्याच्या भानगडीने उघड झाला आहे. तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंध विभागाला अगोदरच कळविले होते ठरल्याप्रमाणे हा सापळा रचण्यात आला आणि संध्याकाळी होळी पेटण्याच्या टायमालाच भ्रष्टाचाराची ही बोंबाबोंब




विभागाने उघड केली आणि मोठी बोंबाबोंब झाली आहे. जिल्हा परिषद पुणे यांच्या माध्यमातून जिल्ह्यातील नागरी सामाजिक विकास कामांसाठी मोठा निधी खर्च केला जातो यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग,तसेच पाणी पुरवठा विभाग,जलसंधारण छोटे पाटबंधारे,एकात्मिक बाल विकास अशा विविध स्वरूपाने छोट्या छोट्या विभागातून कोट्यावधी रुपयांचा सामाजिक कामे करण्यासाठी निधी खर्च केला जातो सामाजिक कामे करण्यासाठी या प्रत्येक विभागातून ठेकेदारी स्वरूपाने कामे करण्यासाठी सुरुवातीला ठेका तयार करण्याची प्रोसेस केली जाते याला गोंडस नाव टेंडर असे म्हणतात. हे टेंडर सुद्धा या विभागातून मॅनेज करण्याचा प्रताप केला जात आहे हे सर्वश्रुत असताना सुद्धा मुख्य कार्यकारी अधिकारी ऐकून बहिरे दिसून आंधळे अशी भूमिका बजावत असतात याचा विपरीत परिणाम या प्रकाराने उघडा झालेला आहे. ठेकेदारी ही राजकीय आशीर्वादात केली जात असली तरी ती अधिकाऱ्यांच्या टक्केवारीची गुलाम बनलेली असते,टक्केवारीच्या वसुली शिवाय अधिकाऱ्यांकडून कुठल्याही स्वरूपाची कागदी कारवाई पूर्ण केली जात नाही आणि म्हणून देणे-घेणे हे नित्याचेच इथे ठरलेले असते आणि हा सर्व प्रकार कार्यालय सुटल्यानंतर संध्याकाळच्या वेळेत केला जातो. जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांना लाच घेताना रंगेहात पकडल्याने जिल्हा परिषदेमध्ये मोठा सावळा गोंधळ असून भ्रष्टाचाराचे आगारच आहे की काय? असा प्रश्न या निमित्ताने पुढे येत आहे. दोन व्यक्ती आणि एक महिला अधिकारी एकाच वेळी जाळ्यात पकडण्याची ही किमया लाच लुचपत विभागाला करण्यासाठी गेले पाच दिवस झगडावे लागलेले आहे गेले पाच दिवसापासून या प्रक्रियेला सुरुवात झाली असून होळीच्या मुहूर्ता वरती तिला अंतिम स्वरूप मिळाले आहे. लाचलुचपत विभागाने अशा स्वरूपाची कारवाई प्रथमच केलेली नसून राज्यांमध्ये अनेक ठिकाणी अनेक कार्यालयातून अशा स्वरूपाच्या मागील काळात घटना घडलेल्या आहेत पण या घटनांचा अखेर आणि शेवट काय झाला हे मात्र सविस्तर रित्या नागरिकांपर्यंत पोहोचत नाही त्यामुळे एखाद्या लाचलुचपत विभागात सापडलेल्या अधिकाऱ्यांची कारवाई ही शेवटच्या क्षणी काय झाली याची माहिती सुद्धा प्रसारमाध्यमातून मिळावी अशा स्वरूपाची मागणी या कारभाराच्या प्रश्नाकडे पाहून जनसामान्यात होते.

# वानोळा,मेंडकी जंगल शिवारात वनवा,७० हेक्टर वनसंपदेची राख

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**माहूर । राजकिरण देशमूख**

आगीच्या तांडवामुळे माहूर तालुक्यातील मेंडकी वन परिमंडळात लाखो रुपयांची वनसंपत्ती जळून खाक झाली आहे.या जंगलाला लागणारा वनवा नित्याची बाब झाली आहे.तरीही वन विभागाचे धोरण दुर्लक्षित आहे.त्याच्या या भूमिकेविषयी वणप्रेमी नागरिकांत नाराजी व्यक्त केली जात आहे.माहूर परिक्षेत्र अंतर्गत येत असलेल्या मेंढकी वन परिमंडळातील मेंडकी, वानोळा शिवारात दि.१५ मार्च रोजी दुपारी ३ वाजता च्या दरम्यान जंगल शिवार आगीच्या भक्ष्यस्थानी सापडले . वानोळा, मेंडकी जंगल शिवारात आज १६ मार्च रोजी दुपारी २ वाजेपर्यंत वनवा सुरूच होता. या आगीने अंदाजे ७० हेक्टर जंगल जळून खाक झाले आहे. यात मौल्यवान वन औषधी सह सागवान वृक्ष जळून खाक झाले आहे.गोंडवडसा, मांडवा

**वन विभागाचे दुर्लक्षित धोरण**



परिमंडळातील पानोळा, मांडवा परिसरातील जंगलाला सुद्धा आठ दिवसापूर्वी आग लागल्याने वनसंपदा नष्ट झाली. ही आग लागली की लावली गेली हा विषय संशोधनाचा ठरत आहे.? जंगलाच्या संरक्षनाची जबाबदारी वनविभागाच्या कर्मचाऱ्यांकडे असताना सुद्धा जंगल शिवाराचे मूल्यांकन होण्यापूर्वीच आग लागतेच कशी? फायर लाईन करूनही वनवा लागला कसा? असे प्रश्नही उपस्थित होत आहे.

**कर्मचाऱ्यांना मुख्यालयाचे वावडे**

माहूर तालुक्यातील पाच वन परिमंडळातील वनपाल,वनरक्षक हे मुख्यालयी राहत नाही.वास्तविक वन यंत्रणेकडे शेकडो हेक्टर जंगल क्षेत्राच्या संवर्धन आणि सुरक्षिततेची जबाबदारी आहे.यासाठी शासनही गंभीर आहे.मात्र माहूर तालुक्यातील वन परिमंडळातील वनकर्मचारी याविषयी गंभीर नाही. येथील कार्यरत वनकर्मचारी हे मुख्यालयाला दांडी मारून माहूर, वाई बाजार येथून अप-डाऊन करून आपले कर्तव्य बजावत आहेत. शेकडो हेक्टर जंगल गस्ती अभावी तस्करांच्या हवाली आहे.आगीच्या घटनेलाही याच बाबी कारणीभूत असल्याचे सांगितले जाते. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देऊन कर्तव्यात कसूर करणाऱ्या वनपाल, वनरक्षकांवर कार्यवाही करावी अशी मागणी भाजपा चे माजी तालुकाध्यक्ष अँड. दिनेश येऊतकर यांनी केली आहे.

# १७ मार्चला कोरपना तहसील कार्यालय येथे पिक विमा तक्रार निवारण सभेचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कोरपना । प्रदिप मडावी**

कोरपाना तालुक्यातील शेतकऱ्यांना पीक विमा मिळण्यासंदर्भात राजुरा विधानसभा क्षेत्राचे आमदार देवराव भोंगळे यांच्या नेतृत्वात भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष आशिष ताजने यांनी तालुक्यातील शेतकऱ्यांसमवेत तालुका कृषी अधिकारी यांना निवेदन ३ मार्च २०२५ रोजी सादर केले होते.

त्या अनुषंगाने सदर निवेदनात तालुक्यातील शेतकऱ्यांना पीक विमा मिळण्यासंदर्भात ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी सोबत तक्रार निवारण सभेचे आयोजन करण्याची मागणी केलेली होती. त्या अनुषंगाने १७ मार्च २०२५रोजी सकाळी ११ वाजता तक्रार निवारण सभेचे आयोजन तहसील कार्यालय येथील सभागृहात केलेले आहे. प्रधानमंत्री पिक विमा योजना सन २०२४-२५ अंतर्गत



तालुक्यातील अधिसूचित पिकांची पिक विमा रक्कम न मिळाल्याने सदर तक्रारी व निवेदने तालुका कृषी अधिकारी कार्यालयास प्राप्त झालेले होते. सदरच्या तक्रारीची सुनवाई कोरपना तहसीलदार तथा अध्यक्ष तालुकास्तरीय तक्रार निवारण समिती यांच्या अध्यक्षतेखाली समितीच्या सभेचे आयोजन केलेले आहे. तसेच खरीप हंगाम २०२४- २५ मध्ये प्राप्त पिक नुकसान व तक्रारीच्या याद्या, पीक निहाय व शेतकरी नहाय प्राप्त पिक नुकसान,तक्रारीच्या अनुषंगाने झालेल्या शेतकऱ्यांच्या याद्या, बाकी असलेल्या शेतकऱ्यांच्या याद्या,पीक विम्याचा आर्थिक लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांच्या याद्या,या प्रकारच्या संपूर्ण याद्या पीक व शेतकरी निहाय तसेच आवश्यक त्या संपूर्ण माहितीसह न चुकता तक्रार निवारण समितीच्या सभेस उपस्थित राहण्याकरिता तालुका कृषी अधिकारी कोरपना यांच्या मार्फत जिल्हा व्यवस्थापक व तालुका प्रतिनिधी ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी यांना कळविलेले आहे. तरी सदर होणाऱ्या पीक विमा तक्रार निवारण सभेस कोरपना तालुक्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष आशिष ताजने यांनी तालुक्यातील शेतकऱ्यांना केलेले आहे.

# १५० ब्रास च्या रॉयल्टी वर २ हजार ब्रास मुरुमाचे उत्खनन, ठेकेदाराचा प्रताप

## तलाठी,मंडळ अधिकारी झोपेत ;सहाय्यक जिल्हाधिकाऱ्याकडे तक्रार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**माहूर । राजकिरण देशमूख**

गौणखनिज तस्करी च्या घटना माहूर तालुक्यात राजरोस पणे घडत असून तालुक्यातील वानोळा शिवारातील एका शेतातून १५० ब्रास मुरूमाची ची रॉयल्टी घेऊन २ हजार ब्रास पेक्षा जास्त मुरुमाचे उत्खनन झाल्याची घटना उघडकीस आल्याने प्रचंड खळबळ उडाली आहे.


सा.बा. विभाग माहूरच्या वतीने वानोळा ते मेंडकी या ३ कि.मी.च्या रस्त्याचे काम सुरु करण्यात आले असून त्याकरिता ५ कोटी रुपयाचा निधी खर्च करण्यात येत आहे. सदर रस्त्याच्या कामासाठी मोठ्या प्रमाणात मुरूमाची



आवश्यकता असल्याने सदरील काम करणाऱ्या ठेकेदाराने वानोळा परिसरातील एका शेतकऱ्यांच्या शेतातून १५० ब्रास मुरुम ची रॉयल्टी भरली, परंतु प्रत्यक्षात मात्र २ हजार पेक्षाही जास्त ब्रास मुरुमचे उत्खन करून शासनाची दिशाभूल करून महसूल बुडविला असल्याची तक्रार वानोळा येथील सामाजिक कार्यकर्ता पंडीत धुप्पे यांनी सहाय्यक जिल्हाधिकारी किनवट व तहसीलदार माहूर यांना सादर केलेल्या तक्रारीने उघडकीस आली आहे. शासनाचा महसूल बुडविणाऱ्या व गौण खनिज चोरी करणाऱ्या संबधित कंत्राटदाराविरुद्ध कारवाई करावी व सदर अवैध मुरुम उत्खननाकडे जाणीव पूर्वक दुर्लक्ष करून कर्तव्यात कसून करणाऱ्या संबंधीत तलाठी व मंडळ अधिकारी यांचे विरुद्ध निलंबनाची कारवाई करण्याची मागणी केली आहे. निवेदनाच्या अनुशंगाने तहसीलदार किशोर यादव यांनी दि.३ मार्च रोजी मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी वानोळा यांना सदर अवैध मुरुम उत्खन प्रकरणी स्थळपाहणी करून चौकशी करून पंचनामा सह अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. वानोळा येथील अवैध मुरुम उत्खनन प्रकरणी इपीएस मोजणी करून पंचनामासह अहवाल तहसील कार्यालयात दोन दिवसात दिवसात सादर करण्यात येईल अशी माहिती वानोळा चे महसूल मंडळ अधिकारी एस.के.साळसुंदर यांनी दिली.

# कै.सुधाकरराव श्रीपतराव शिंदे यांचे निधन

**लोकनेता न्यूज नेटवर्क । भोकरदन । राम शिंदे**



कै. सुधाकरराव श्रीपतराव शिंदे रा. दानापूर यांना दिनांक१५.०३.२०२५ रोजी वार शनिवार ठीक रात्री११.०० वाजता हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले त्यांचे निधन समयी वय७१ वर्षाचे होते त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी , सुना, नातवंडे, पुतणे, असा मोठा परिवार आहे, माजी .सरपंच अरुण भाऊ शिंदे यांचे ते काका होत.

# तिर्रट नावाच्या जुगार अड्डयावर पोलीसांची धाड



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । जयपाल दावनगीरकर**

देगलूर तालुक्यातील मौजे तुपशेळगाव येथे बऱ्याच दिवसापासून सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलिसांनी मोठ्या सिताफिणे धाड टाकून पाच जणांना अटक केली आहे. मौजे तुपशेळगाव या ठिकाणी जुगार अड्ड्याचा डाव अनेक दिवसांपासून सुरू होता होळीच्या दिवशी रात्री अकरा वाजताच्या सुमारास जुगार अड्डुयावर खुलेआम राजरोसपणे शेकडो रूपये लाऊन तिर्रट नावाचा जुगार खेळ खेळत असताना पोलिसांनी जुगार अड्ड्यावर धाड टाकून लक्ष्मण चिंतलवार, शेषराव वाघमारे, मोहन सावित्रावार, मारोती पाटील, किशन चिंतलवार सर्व रा. तुपशेळगाव यांना पोलिसांनी अटक केली व त्यांच्याकडून रोख रक्कमा व जुगाराचे साहित्य जप्त केले आहे.

# १८ मार्च रोजी उमरी येथे पहिले मराठवाडा कृषी ग्रामीण साहित्य संमेलन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । महेश पडोळे**

गोदावरी शिक्षण संस्था तळेगाव च्या वतीने कै. श्रीधरराव देशमुख यांच्या स्मरणार्थ पहिले मराठवाडा कृषी ग्रामीण साहित्य संमेलनाचे आयोजन दि.१८ मार्च २०२५ रोज मंगळवारी उमरी येथील गिरीष देशमुख इंग्लिश स्कूल विद्याभारती ज्यु. कॉलेज उमरी येथे आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमास उद्घाटक म्हणून

श्री. माधवराव पा. शेळगावकर मा.अध्यक्ष स्वछता समिती महाराष्ट्र राज्य यांचे शुभ हस्ते होणार आहे. तर संमेलनाध्यक्ष पदी प्रसिद्ध सृजनशील कवी विडंबनकार मा.प्रभाकर साळेगावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे. या संमेलनच्या स्वागत अध्यक्ष गोदावरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ विक्रम देशमुख राहणार आहेत शिक्षण,सामाजिक,अध्यात्मात ज्यांनी उमरी तालुक्यात भरीव असे काम केले ते लोकनेते स्व.बाबासाहेब देशमुख गोरठेकर यांचे नाव संमेलन स्थळी साहित्यनगरी ला देण्यात आले आहे,तर साहित्य व शिक्षण क्षेत्रात मराठवाडा भर ज्यानी ख्याती प्राप्त केली असे स्व. ग.पी.मनुरकर सरांचं नाव व्यासपीठाला देण्यात आल आहे.स्व.राजेश देशमुख तळेगावकर यांच्या स्मरणार्थ, कै.आर.आर.पाटील पुरस्काराचे वितरण मा. दिलीपराव धर्माधिकारी जिल्हा अध्यक्ष रा काँ पार्टी नांदेड व श्री.राजेश कुंटूरकर राज्य कार्यकारिणी सदस्य भाजप यांच्या शुभहस्ते विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना सन्मानित करण्यात येणार आहे.यात डॉ. सूरज जाधव न्यूरो सर्जन आरोग्य वैद्यकीय सेवा, कृषी साहेबराव शिंदे बोळसेकर, प्रशासकीय सेवा महेश खदगाये, अध्यात्म गंगाधर होंडाळे सेलगावकर, साहित्य शिवाजी जोगदंड, शिक्षण सतीश पा.निमटेककर तर संमेलनच्या निमित्ताने प्रकाशित करण्यात येणार्या साप्ताहिक प्रभात वार्ता च्या विशेषांकाचे प्रकाशन अँड. भाऊसाहेब देशमुख प्रदेश सरचिटणीस रा काँ पार्टी यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. दुपारच्या सत्रात होणार्या, कथा कथन सत्राच्या अध्यक्ष स्थानी श्री.राम तरटे तर कवी संमेलना च्या अध्यक्षस्थानी बापू दासरी यांची प्रमुख उपस्थितीत राहणार आहे. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती श्री.प्रशांत थोरात साहेब तहसीलदार, श्री.व्ही.आर अडबलवाड बी.डि.ओ. अँड ,सौ.नीलम कांबळे मुख्याधिकारी न. प. उमरी,श्री.अंकुश माने साहेब पोलीस निरीक्षक उमरी,श्री. धोंडबाराव देशमुख सचिव गोदावरी शिक्षण संस्था, गोविंदराव पा.सिंधीकर अध्यक्ष गो. शि. संस्था, श्री. मारोतराव कवळे अध्यक्ष व्ही. पी.के.उद्योग समूह, प्रा. डी.बी.जांभरुणकर सरचिटणीस रा.काँ.पार्टी, श्री.गजानन पांपटवार प्रदेश सरचिटणीस, श्री.रंगनाथ वाघ जिल्हाध्यक्ष शिक्षण संस्था संघ, श्री. बाळासाहेब भोसीकर, श्री.ज्ञानेश्वर पा. सावंत तालुकाध्यक्ष भाजप. रफीक म. सज्जन सेठ, पारस सेठ दर्डा डी.आर. सी. यु. मेंबर, बापूसाहेब पा. कोडगावकर युवा नेते भाजप, मा.प्रा.सोपानराव लामकाणीकर, श्री.ए. एस. जाधव सर,डॉ.अमोल ढगे जिल्हाध्यक्ष विद्यार्थी भाजप, श्री. सुधाकर देशमुख पॅनल प्रमुख ग्रा.प.धानोरा,श्री. सुभाष पेरेवार मा. नगरअध्यक्ष, सौ.सुनंदाताई जोगदंड जिल्हाध्यक्षा रा.काँग्रेस पार्टी, सौ.संध्याताई राजेंद्र शिंदे जिल्हा कार्याध्यक्ष, श्री. आनंदराव येलमगोंडे मा. जि. प. सदस्य प्रतिनिधी,श्री. अशोक पा.चिंचाळकर, प्रा.भगवानराव अंजनी कर,दिगंबर कदम, नागोराव डोंगरे,यांच्या प्रमुख उपस्थितीत हे साहित्य संमेलन संपन्न होणार आहे.तरी या साहित्य संमेलनास उमरी तालुक्यातील पंचक्रोशीतील साहित्यिकांनी व पालक वर्गाणी उपस्थित राहून. या कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन संमेलनाचे स्वागताध्यक्ष तथा गोदावरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. विक्रम देशमुख तळेगावकर, सौ. स्वाती वच्चेवार,श्री. सतीश देशमुख, श्री.विश्वजित देशमुख,श्री.बाबुराव खतगाये,श्री. संजय हिवराळे यांनी केले आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904